अस्सल सोलापुरी दैनिक

१० दशकपूर्ती वर्ष

सुराज्य सोलापूर

बोस

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

सोलापूर, शुक्रवार, दि. २३ नोव्हेंबर २०१२ वर्ष : ११ वे अंक : ५५ किंमत : ३ रु

# शिवकृपा पतपेढीचा वर्धापन दिन उत्साहात

खर्डी (प्रतिनिधी)

महाराष्ट्राच्या सहकार चळवळीत आदर्शवत काम करणारी शिवकृपा सहकारी पतपेढी लि.मुंबईच्या पंढरपूर शाखेत तिसावा वर्धापन दिन उत्साहात करण्यात आला.

१९८२ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेच्या प्रगतीत पदाधिकारी, संचालक मंडळ, कर्मचारी व ठेव वसुली प्रतिनिधी यांचे मोलाचे योगदान आहे. शिवकृपा संस्थेच्या संपूर्ण महाराष्ट्र कार्यक्षेत्रात ६३ शाखा व ५ विभागीय कार्यालये कार्यान्वित असून संस्थेचा संमिश्र व्यवसाय १२८५ कोटी रुपयांचा आहे. संस्थेत आज रोजी ५०५ कर्मचारी व ८८७ ठेव संकलन प्रतिनिधी आपले काम कर्तव्य भावनेने पार पाडत आहेत.

संस्थेच्या सर्व शाखा सुसज्ज, वातानुकूलित, संगणकीकृत असून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मुंबई, ठाणे, पुणे, सातारा व कोरेगाव, अशी ५ विभागीय कार्यालये कार्यरत आहेत.

संस्थेला सन २०१०-११ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबई यांच्याकडून 'सर्वोत्कृष्ट आदर्श पतसंस्था' म्हणून गौरविण्यात आलेले आहे. या कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर सागर कमले, शितलकुमार भालेराव, सौदागर कुंभार, दीपक घनवट, अमोल राऊत, शाखाधिकारी गजानन घार्गे, प्रमोद तारू, अमोल जाधव, निलेश बाबर उपस्थित होते.



**शिवकृपा सहकारी पतपेढीचा वर्धापनदिन साजरा करताना सागर कमले, शितलकुमार भालेराव, सौदागर कुंभार, दीपक घनवट आदी.**